शिल्पकार विकासाचा...
देशदूत
हर हर महादेव
कावड यात्रा
श्रावण मास
इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २१२ । सोमवार, दि.२८ जुलै २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

संपादकीय

मार्गदर्शक सूचनांचा अन्वयार्थ

भारतीय समाजरचना पुरुषप्रधान आहे. अशा समाजरचनेत महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. बहुतेक महिलांच्याही ते अंगवळणी पडले आहे. पुरुषांनी दुय्यम लेखण्यात काही गैर आहे, असेही त्यांना वाटत नाही. कार्यक्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करून घरी परतल्यावर बुद्धीच नसल्याचे सोंग आणणे कोणालाही अवघडच! त्यामुळे सासरघरी अन्याय आणि प्रसंगी अत्याचार सोसणे अनेकींच्या आयुष्याचे वास्तव बनते. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले आहेत. बदलत्या काळानुसार आणि गरजेनुसार त्यात दुरुस्त्याही केल्या जातात. पीडित महिलांना कायदे बळ देतात. न्याय मागण्याचे धाडस महिलांमध्ये निर्माण करतात. तथापि अलीकडे मात्र या कायद्यांचा गैरवापर वाढू लागला आहे. अवास्तव मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी किंवा सासरकडील व्यक्तींना धडा शिकवण्याचा उद्देश त्यामागे असतो, अशी निरीक्षणे उच्च न्यायालयाची खंडपीठे आणि सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा नोंदवली आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा नवा आदेश त्याला बळकटी देणारा ठरू शकेल. 'कलम ४९८-अ' अंतर्गत तक्रार दाखल झाल्यावर संबंधितांना दोन महिने अटक करू नये आणि कौटुंबिक कल्याण समिती स्थापन करावी, अशा सूचना अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणात केल्या होत्या. शिवांगी आणि साहिब बन्सल या जोडप्याच्या प्रकरणाची सुनावणी तेव्हा सुरु होती. सर्वोच्च न्यायालयाने या मार्गदर्शक सूचनांना नुकतीच मान्यता दिली. त्यामुळे 'कलम ४९८-अ'चा गैरवापर थांबावा, अशी न्यायालयाची अपेक्षा आहे. कायदा कोणताही असो, त्याचा गैरवापर निषेधार्हच! कोणी कोणावरही अन्याय करू नये हे जितके खरे; तितकेच कायद्याचा गैरवापर सूडबुद्धीने करणे हाही अन्यायच आहे. म्हणून या कलमाच्या गैरवापराचे निरीक्षण सरकार, महिलांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संघटना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी गंभीरपणे घेण्याची गरज आहे. कारण पीडित महिलांना कायद्याचे बळ मिळणे अत्यावश्यक आहे. अशाच महिलांची संख्या समाजात पान २ वर

खडसेंचा 'खेल' वलकर!
जावई ताब्यात! आरोप-प्रत्यारोपांना जोर

दोषी असेल तर जावयाला शिक्षा द्या-आ.खडसे

सर्व रिपोर्ट आल्यानंतर यावर अधिक भाष्य करता येईल. अपुऱ्या माहितीच्या आधारावर भाष्य करणे हे चुकीचे होईल. त्यामुळे नंतर मी पत्रकार परिषद घेईन. तथ्य समोर येईल. यामध्ये जावई असो किंवा कोणीही असो जर दोषी असेल तर शासन झालेच पाहिजे. पण कोणाला अडकवण्याचा प्रयत्न होत असेल तर ते सहन केले जाणार नाही. फॉरेन्सिक लॅबचे रिपोर्ट येऊ द्या.त्या नंतर मी सविस्तर या विषयावर बोलेल पण या मुळे प्रफुल्ल लोढाने जे आरोप केले आहेत. त्याचे देखील सत्य जनतेसमोर आले पाहिचे असे एकनाथराव खडसे यांनी म्हटले आहे. गुन्हा हा गुन्हाच असतो. तो माझ्या जावायाने केला असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे. मात्र याचवेळी राज्यभरात अनेक प्रकरणे दाखल आहेत. त्याचाही पोलिसांनी तपास करायला हवा.

देवेंद्र फडणवीसांची सावध भूमिका

पुण्यातील खराडीमधील एका सोसायटीत सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी छापा टाकत मोठी कारवाई केली. या प्रकरणावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावध प्रतिक्रिया दिली आहे. पुण्यात रेव्ह पार्टीच्या संदर्भातील अशा प्रकारचा गुन्हा त्या ठिकाणी घडला आहे. मात्र, मी कार्यक्रमात असल्याने अद्याप अधिकृत आणि सविस्तर माहिती घेतलेली नसल्यामुळे मी माहिती घेतल्यानंतर सविस्तर बोलेन, मी माध्यमांत बातम्या पाहिल्या आहेत. मी सकाळपासून कार्यक्रमात आहे. कार्यक्रमात असल्यामुळे मला त्या घटनेसंदर्भात अद्याप अधिकृत माहिती घेता आली नाही. मात्र, माध्यमांमधून जी काही माहिती समोर आली आहे, त्यानुसार पोलिसांनी रेव्ह पार्टीवर छापा टाकत कारवाई केली आहे. त्या कारवाईत काही ड्रग्स वगैरे आढळून आलेले आहेत. या घटनेची मी जेव्हा अधिकृत माहिती घेईल, तेव्हा सविस्तर बोलू शकेन. असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

पुणे । पुण्यातील हाय प्रोफाईल रेव्ह पार्टीवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये माजी मंत्री एकनाथराव खडसे यांच्या जावयाला पकडण्यात आले आहे. पुण्यातील खराडीतील एका फ्लॅटमध्ये ही रेव्ह पार्टी करण्यात येत होती. प्रांजल खेवलकर,बुकी निखील पोपटा यांच्यासह ७ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

रॅडीसन हॅटेलच्या मागे एका इमारतीत हा प्रकार सुरु होता. दोन तरूणी आणि पाच पुरुष या रेव्ह पार्टीत होते. छाप्यात पोलिसांना अमली पदार्थ सापडले आहेत. प्रांजल खेवलकर हा शरद पवार राष्ट्रवादीच्या नेत्या रोहिणी खडसे यांचा पती आहे. त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फ्लॅटमधून हुक्का, ड्रग्स, गांजा, दारू आदी जप्त करण्यात आले आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेला याची माहिती मिळाली होती. सातही जणांवर पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या रेव्ह पार्टीत आणखी तीन महिला देखील होत्या, त्या छाप्यावेळी पळून जाण्यात यशस्वी ठरल्या होत्या. त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. मध्यरात्री साडे तीनच्या सुमारास कारवाई करण्यात आली आहे.

जावयाला अलर्ट करायला हवे होते-ना.महाजन

मंत्री गिरीश महाजन यांनी प्रसार माध्यमांशी सकाळीच संवाद साधला. याप्रकरणात पोलिस तपास करत आहे. त्यामुळे याविषयीची संपूर्ण माहिती अद्याप समोर आलेली नसल्याचे ते म्हणाले. पण जी माहिती हाती आली आहे, त्यानुसार, एकनाथराव खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर हे या पार्टीत होते. त्यांचा समावेशच नव्हता तर त्यांनी ही पार्टी आयोजित केली होती, असा आरोप महाजन यांनी केला.असे काही तरी होईल आणि कुटुंबातील सदस्याला अडकवण्यात येईल असे आपल्याला पूर्वीपासून वाटतं होते. अशा घटनेची पूर्वकल्पना होती, अशी प्रतिक्रिया नाथाभाऊंनी दिल्याचे माध्यम प्रतिनिधींनी महाजन यांना सांगितले. त्यावर महाजनांनी प्रतिक्रिया दिली. मग त्यांनी जावयाला अलर्ट करायला हवे होते, असे ते म्हणाले. हा तपासाचा भाग आहे, असे महाजन म्हणाले. प्रत्येक वेळीच षडयंत्र कसे असेल, असा सवाल महाजन यांनी केला. ७-८ जणांचे मोबाईल तपासल्यावर समोर येईल. त्यांच्या जावयांना कोणी कडेवर घेतले आणि तिथे नेऊन ठेवले, असे तर झाले नाही ना? असा चिमटा महाजनांनी काढला.

सांड मोकाट सुटलाय-संजय राऊतांचा महाजनांवर हल्लाबोल

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजप नेते गिरीश महाजन यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. आजकाल कोणालाही अटक केली जाते. सध्या कधी कोणाला अटक होईल, कधी कोणावर गोळीबार होईल, सरबत पिणाऱ्या माणसालाही दारु पितो म्हणून अटक केली जाईल, काहीही होऊ शकते. पोलीस आणि पोलिसांची यंत्रणा भाजप विरोधात असलेल्यांना याप्रकारे त्रास देण्यासाठीच इथे आहेत. भाजपच एक रेव्ह पार्टी आहे. याआधीही खडसेंच्या जावयाला ईडीने ताब्यात घेतले होते, पण त्यात काही मिळाले नाही. दोन दिवसांपासून एकनाथराव खडसे सरकारच्या विरुद्ध, खास करुन गिरीश महाजनांच्या विरोधात ठामपणे भूमिका मांडतात. ते पुराव्यांसह बोलतात. त्यानंतर पुढील २४ तासात ही रेव्ह पार्टीची कारवाई होते. खडसेंनी जे मुद्दे मांडले, जे आरोप केले, त्याची चौकशी होत नाही. पण जो आरोप करतो, त्याच्या घरावर धाडी घातल्या जातात. तुमचा संपूर्ण भारतीय जनता पार्टी ही एक रेव्ह पार्टी आहे, अशी टीका राऊतांनी केली. गिरीश महाजन नावाचा सांड मोकाट सुटलाय अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे.

मी अमली पदार्थांचे सेवन केलेच नाही! खडसेंच्या जावयाचा न्यायालयात दावा!

खराडी येथील रेव्ह पार्टी प्रकरणी खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर अटकेत आहेत. त्यांना पुणे पोलिसांनी आज न्यायालयात हजर केले. या रेव्ह पार्टी प्रकरणाची अधिक चौकशी करण्यासाठी प्रांजल खेवलकर यांना पोलीस कोठडी द्यावी, अशी मागणी पोलिसांनी केली आहे. तर खेवलकर यांना कोठडी सुनावण्याची आवश्यकता नाही, असे मत त्यांच्या वकिलांनी मांडले आहे. रेव्ह पार्टी प्रकरणात न्यायालयात सुनावणी चालू झाल्यानंतर सरकारी वकिलाने त्या पार्टीमध्ये कोकेन आणि गांजा सापडला आहे, असा दावा केला. तसेच या सर्व वस्तू कुठून आल्या, कशासाठी आणल्या होत्या तसेच कोणाकडून आणण्यात आल्या याचा तपास करायचा आहे, असे सांगत खेवलकर यांना पोलीस कोठडी द्यावी, अशी मागणी केली. सरकारी वकिलाचा हा युक्तिवाद खेवलकर यांच्या वकिलाने खोडून काढला.

खेवलकर रेकॉर्ड वरील गुन्हेगार, पोलिसांचा दावा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे यांचे जावई, रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली. त्यांच्यासह एकूण सात आरोपींना पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले आहे. प्रांजल खेवलकर यांच्याविषयी पुणे पोलिसांनी न्यायालयात धक्कादायक बाबी सांगितल्या. प्रांजल खेवलकर हे रेकॉर्ड वरील गुन्हेगार असल्याचा पुणे पोलिसांनी दावा केला आहे. आरोपी प्रांजल खेवलकर यांनी रेव्ह पार्टीसाठी एकूण ३ रूम बुक केल्या होत्या. हॉटेलच्या आवारातून तीन व्यक्ती येऊन गेल्याची प्राथमिक माहिती तपासादरम्यान मिळाली असून त्यांचा शोध घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस करावयाची आहे, असे पोलिसांनी सांगितले. तसेच याच तिघांनी अमली पदार्थ (ड्रग्ज) दिल्याचा संशय पोलिसांना आहे. आरोपी प्रांजल खेवलकर आणि श्रीपाद यादव हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचा दावा करून या रेव्ह पार्टीचा मुख्य सूत्रधार वेगळाच आहे, त्याचा शोध घ्यायचा आहे, असे पोलिसांनी सांगितले. तसेच दाखल गुन्ह्यातील आरोपीचे अंमलीपदार्थ तस्करीशी तसेच आंतरराज्यीय टोळीशी काही संबंध आहेत का? याबाबत तपास करायचा आहे असे सांगून पोलिसांनी आरोपींची सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली.

रक्त चाचणीचा रिपोर्ट बदलला नाहीतर...

तसेच, पोलिसांनी हा सगळा ट्रॅप लावला असावा. कारण यापूर्वी दोन ते तीन वेळा माझ्यावर पाळत ठेवण्याचा प्रयत्न केला गेलाय. पोलीस कोठडी कशासाठी हवीय आहे. कारण त्याची गरज नाहीये, अशी बाजू खेवलकर यांनी आपल्या वकिलाच्या माध्यमातून मांडली. तसेच पोलिसांनी जर रक्त चाचणीचा रिपोर्ट बदलला नाहीतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारची नशा केलेली दिसणार नाही, खेवलकर यांनी कोणत्याही अमली पदार्थाचे सेवन केलेल नाही, असा मोठा दावा खेवलकर यांच्या वकिलाने काल आहे.

पोलिसांनी रचलेला बनाव, वकिलांना संशय

एकनाथराव खडसे यांचे जावई, रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना २९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. परंतु पुण्यातील हे ड्रग्ज प्रकरण खडसे यांच्या जावयाविरोधात पोलिसांनी रचलेला बनाव आहे असा संशय आरोपी प्रांजल खेवलकर यांच्यावतीने ॲड. विजय ठोंबरे यांनी न्यायालयात व्यक्त केला. आरोपी प्रांजल खेवलकर यांच्यावतीने ॲड. विजय ठोंबरे यांनी न्यायालयात बाजू मांडली. ठोंबरे म्हणाले, रेव्ह पार्टी हा पूर्णपणे बनाव आहे. रेव्ह पार्टी म्हणजे बालिशपणा वाटतो. एका फ्लॅटमध्ये ४ जण एकत्र येतात त्याला रेव्ह पार्टी म्हणता येणार नाही. कुठल्याही पदार्थाचे सेवन खेवलकर यांनी केले नव्हते. रक्त चाचण्यांचे अववाल आल्यावर पुढील बाबी स्पष्ट होतील. त्यांनी कोणत्याही अमली पदार्थांचे सेवन केले नव्हते. खेवलकर ज्या हॉटेलमध्ये होते, तिथे रेकी करण्यात आली होती. दोन वेळा त्यांच्या विरोधात सापळा रचला गेला होता. यापूर्वी देखील खेवलकर यांना अडकविण्याचा प्रयत्न झाला आहे. या प्रकरणात एकही कलम लागू होत नाही. पंचनाम्यामध्ये अनेक गोष्टी दाखवल्या गेल्या. पोलीस गेले आणि व्हिडिओ काढले. मात्र सत्यस्थिती अशी आहे की एकाही अहवालातून त्यांनी अमली पदार्थांचे सेवन केले, असे स्पष्ट झालेले नाही. याचाच अर्थ पोलिसांनीच या प्रकरणाचा बनाव रचला का, असा संशय घ्यायला वाव आहे, असे खेवलकर यांचे वकील विजय ठोंबरे म्हणाले.

केळी भाव

नवती (१) : 2175
नवती (२) : 1975

मिस्किली

राज ठाकरे मातोश्रीवर!
बाळासाहेबांच्या खोलीतच दोघं भाऊ भेटले

मुंबई । शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वतः मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना लाल रंगाच्या गुलाबाचा पुष्पगुच्छ देत वाढदिवसाच्या शुभेच्छा देत सदिच्छा व्यक्त केल्या.

राज ठाकरे यांनी सकाळी ११.३० वाजता शिवतीर्थहून निघत दुपारी १२ वाजता मातोश्री गाठले. राज ठाकरे आल्याचे समजताच उद्धव ठाकरे स्वत: त्यांचे स्वागत करण्यासाठी बाहेर आले.

या ठिकाणी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही भावांनी एकमेकांना अलिंगन दिले. गुलाबाचे पुष्पगुच्छ देत वाढदिवसानिमित्त सदिच्छा दिल्या. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे मातोश्रीत गेल्यानंतर आत बरंच काही घडले. दोन भाऊ भेटले. एकमेकांना प्रेमाचे आलिंगन दिले. गप्पा झाल्या. शिवसेनाप्रमुखांच्या खोलीत व्यंगचित्रांवर चर्चा झाली. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. बऱ्याच चर्चा झाल्या, दोन भाऊ भेटले, दोन नेते भेटले नाहीत. दोन भाऊ आहेत. भेटणे गरजेचे आहे. भेटले. आले. नातं दृढ होत आहे. होतंच. आम्हाला त्याचा आनंद आहे, असे संजय राऊतांनी म्हटले.यावेळी संजय राऊत यांना राजकीय युतीबद्दल विचारले असता त्यांनी सूचकपणे प्रतिक्रिया दिली, जे होईल ते चांगलंच होईल असे म्हटले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. या भेटीचे राज्याच्या राजकारणावर काय परिणाम होतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



चेन्नई । तामिळनाडूच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गंगाईकोंडा चोलापुरम मंदिरात दर्शन घेतले.